CNRMHSN110008412022

संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३४९/२०२२ नि. १ वरील आदेश

ज्ञानेश्वर शामराव पाटील वि. नितीन महादेव काळे

फिर्याद, फिर्यादीचा जबाब (सत्यापन) व त्याच्या सोबत दाखल केलेल्या दस्ताऐवजाचे अवलोकन केले. आरोपी हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्राच्या बाहेर राहणारा दिसून येतो. या कामी सादर करण्यात आलेले सत्यापनाचा वापर हा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०२ अन्वये चौकशीसाठी देखील विचारात घेतला जावू शकतो. सबब सदरचे सत्यपन व त्यासोबत सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता आरोपीने परक्राम्य दस्तऐवज अधिनियम १८८१ चे कलम १३८ अन्वये गुन्हा केला असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते.

२. सदर गुन्हयाबाबत आरोपीविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ कलम २०४ अन्वये आदेशिका काढण्यात यावी. आरोपीस न्यायालयासमोर हजर राहण्याकरीता पुढील तारीख समन्समध्ये नमूद करण्यात यावी.

३. आरोपीला गुन्हयासंदर्भात तडजोड करावयाची असल्यास त्याला पुढील तारखेस त्याबाबतचा अर्ज करु शकतो.

४. आरोपीने खटल्याच्या चौकशीच्या दरम्यान गुन्हा नाकबुल केल्यास प्रस्तुत फिर्याद सोबत दाखल करण्यात आलेल्या सत्यापनाचे (verification) प्रतिज्ञापत्र पुराव्याचे प्रतिज्ञापत्र म्हणून वाचण्यात येईल याची आरोपीने नोंद घ्यावी.

५. मुद्दा क्र. ३ व ४ याचा उल्लेख समन्समध्ये करण्यात यावा.

VINAYAK DATTATRAY PATIL

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2022.08.10 18:57:02 +05'30'

दि. १२.०८.२०२२ (वि. द. पाटील)

आटपाडी न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग आटपाडी